शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना,
शिवाजीनगर,पुणे - ४११ ००५,
परिपत्रकक्र./ खाप्राशा/- ९४ /२०००-२००१,
पुणे,दिनांक :- ४.१२.२०००.

अत्यंत तातडीचे

# प रि प त्र क

विषय :- मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना
[कायमविनाअनुदानित/विनाअनुदानित] नवीन
तुकडयांना मान्यता देणेबाबत. सन २०००-२००१.

संदर्भ :- मा.शिक्षण उपसंचालक यांचेकडील पत्र जा.क्र. पुप/
प्राशि/खाप्रशा/ तुमा/पुवि/२०००-१४४११ दि.
२८.११.२०००.

कायम विनाअनुदानित व विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांनी इ. १ ली ते इ. ५ वी पर्यंतचे फक्त नैसर्गिक वाढीचे प्रस्ताव कार्यालयास त्वरीत सादर करावेत.

प्रस्ताव सादर करताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१] तुकडयांचे प्रस्ताव सादर करतांना शासन निर्णय दिनांक २.१२.९६ मध्ये दिलेल्या प्रपत्र क्रमांक १,२,३ मध्ये प्रत्येक शाळेचा प्रस्ताव असणे अत्यावश्यक आहे. तसेच सर्व शाळांच्या प्रस्तावांचे संकलन करुन त्यावर आपले आडवे विहित प्रपत्र आपल्या अभिप्रायांसह असणे अत्यावश्यक आहे.

२] प्रत्येक शाळेचे दिनांक ३०.९.२००० च्या पटसंख्या उपस्थितीचे वर्गनिहाय माहिती देणारे प्रपत्र सोबत असणे अत्यावश्यक आहे.

३] ज्या शाळांनी तुकडया मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केले आहेत.त्या शाळांस या कार्यालयाकडून अंतिम परवानगी अथवा नुतनीकरणाचे परवानगी तीन वर्षे सलग घेणे क्रमप्राप्त असल्यास त्याबाबतची परवानगी पत्रे या कार्यालयास प्रस्तावासोबत सादर करणे अत्यावश्यक आहे.

४] तुकडी प्रस्तावासोबत यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या तुकडयांचे या कार्यालयाच्या आदेशाच्या प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे.

५] विनाअनुदानित शाळांचे व कायम विनाअनुदानित शाळांचे प्रस्ताव हे वेगवेगळे सादर करण्यात यावेत. तसेच विनाअनुदानित शाळांचे प्रस्ताव सादर करतांना ज्या शाळेस इ. १ ली चा वर्ग असेल तर त्याचा इ. २ री चा नैसर्गिक वाढीच्या वर्गाचा प्रस्ताव पाठवावा. किंवा शाळेमध्ये ३ पर्यंतचे वर्ग मंजूर असतील तर इ. ४ थी च्या नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव पाठवावा.

......२/-

६] इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळांचे प्रस्ताव पाठविताना परिसरातील इतर इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेवर विपरित परिणाम होणार नाही याची नोंद घेऊन दिनांक ३०.१.९६ व २.८.९६ च्या शासन निर्णयातील निकषानुसार त्या शाळांचे तुकडी/वर्ग मंजूरीचे प्रस्ताव आपल्या स्पष्ट शिफारशींसह या कार्यालयास सादर करावेत.

७] इतर माध्यमाच्या कायम विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक शाळांच्या नैसर्गिक वाढीच्या अतिरिक्त वर्ग/तुकड्यांचे प्रस्ताव पाठविताना संस्थेचे सदर तुकडी कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असलेबाबत, तसेच भविष्यकाळात शासनाकडे त्या तुकडीबाबत कोणतेही अनुदान मागणार नाही. याबाबत अनावश्यक स्पर्धा इतर शाळांबरोबर करणार नाही याबाबत हमीपत्रे लिहून घेऊन या कार्यालयास मूळ प्रतीत पाठवावे.

वरील सर्व सूचनांचे पालन करुन परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयास दि.८.१२.२००० पर्यंत प्राप्त होणे अत्यावश्यक आहे. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर कार्यवाही केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सोबत आडवा तक्ता व प्रपत्र क्र. १,२,३ जोडले आहे.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

प्रति :-
खाजगी मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित प्राथ. शाळा.

सादर - मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.